सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन

# सहसंचालक, तंत्रशिक्षण, विभागीय कार्यालय, अमरावती.

शासकीय तंत्रनिकेतन परिसर, गाडगेनगर, अमरावती.
Email :-roamravati@dtemaharashtra.gov.in Web :- www.jdroamt.org
Phone :- 0721- 257 3027, 2572577 Fax :- 0721- 257 7913

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

जा.क्रमांक.:- विकाअ/शिक्षण/२०२५/ 1152
दिनांक :- 17 APR 2025

प्रति,
प्राचार्य,
PCI या शिखर संस्थेच्या अधिपत्याखालील,
अभ्यासक्रमाच्या सर्व विद्यमान / प्रस्तावित नवीन संस्था,
अमरावती विभाग, अमरावती.

**विषय :- शैक्षणिक वर्ष २०२५-२६ करीताच्या विद्यमान संस्थेतील PCI नवी दिल्ली या शिखर संस्थेच्या अधिपत्याखालील अभ्यासक्रमाच्या व प्रस्तावित नवीन संस्थेच्या मान्यता प्रक्रियेबाबत.**

**संदर्भ:-** १. मा. संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, म.रा. मुंबई यांचे पत्र क्र. २/एनजीसी/मान्यता पीसीआय/२०२५ २३८ दिनांक १६/०४/२०२५.
२. फार्मसी कौन्सिल ऑफ इंडिया, नवी दिल्ली यांची शैक्षणिक वर्ष २०२५-२६ करिता मान्यता प्रक्रिये संदर्भात प्रसिध्द करण्यात आलेले परिपत्रक क्र. १४-५६-PCI (Approval Process for २०२५-२६ a.s.)/५०८० दि. १७/१२/२०२४.

उपरोक्त विषयाबाबत आपणास कळविण्यात येते की, मा. संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, म.रा. मुंबई यांचे संदर्भ पत्र क्र. १ चे शैक्षणिक वर्ष २०२५-२६ करीताच्या विद्यमान संस्थेतील PCI नवी दिल्ली या शिखर संस्थेच्या अधिपत्याखालील अभ्यासक्रमाच्या व प्रस्तावित नवीन संस्थेच्या मान्यता प्रक्रियेबाबतचे पत्र सोबत जोडलेले आहे तसेच फार्मसी कौन्सिल ऑफ इंडिया, नवी दिल्ली यांची शैक्षणिक वर्ष २०२५-२६ करिता मान्यता प्रक्रिये संदर्भात प्रसिध्द करण्यात आलेले परिपत्रक क्र. १४-५६-PCI (Approval Process for २०२५-२६ a.s.) / ५०८० दि. १७/१२/२०२४ च्या परिपत्रकाचे अवलोकन करावे व त्यामध्ये दिलेल्या मुदतीपर्यंत प्रस्ताव व आवश्यक असलेले नोंदणी शुल्क या कार्यालयाकडे सादर करावे.

सहपत्र :- वरीलप्रमाणे.

**( मनोज म. अंधारे )**
**प्र. सहसंचालक तंत्रशिक्षण,**
अमरावती.

**प्रत:- प्रोग्रामर,** तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, अमरावती यांना संकेतस्थळावर टाकण्याकरीता.

महाराष्ट्र शासन

# तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य

३, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्र.१९६७, मुंबई ४०० ००१.
दूरध्वनी क्र. ०२२-६८५९७४६५/४७५/४९२/४४२/४४३
ई-मेल – desk2@dtemaharashtra.gov.in, वेबसाईट: https://dtc.maharashtra.gov.in

परिपत्रक :

क्रमांक: २/एनजीसी/मान्यतापीसीआय/२०२५ 236 दिनांक : 16 APR 2025

प्रति,
प्राचार्य,
PCI या शिखर संस्थेच्या अधिपत्याखालील
अभ्यासक्रमाच्या सर्व विद्यमान / प्रस्तावित नवीन संस्था,
महाराष्ट्र राज्य

विषय :-शैक्षणिक वर्ष २०२५-२६ करीताच्या विद्यमान संस्थेतील PCI नवी दिल्ली या शिखर संस्थेच्या अधिपत्याखालील अभ्यासक्रमांच्या व प्रस्तावित नवीन संस्थेच्या मान्यता प्रक्रियेबाबत.....

संदर्भ :-१) फार्मसी कौन्सिल ऑफ इंडिया, नवी दिल्ली यांची शैक्षणिक वर्ष २०२५-२६ करिता मान्यता प्रक्रिये संदर्भात प्रसिध्द करण्यात आलेले परिपत्रक क्र. १४-५६/२०२४-PCI (Approval Process for २०२५-२६ a.s.)/५०८० dt. १७.१२.२०२४

२) शासन पत्र उच्च व तंत्रशिक्षण विभाग क्रमांक मान्यता-२०२४/प्र.क्र.४४०/ तांशि-४, दिनांक १६.४.२०२५

फार्मसी कौन्सिल ऑफ इंडिया, नवी दिल्ली यांचेतर्फे अधिसूचना / जाहीर सूचना / परिपत्रका द्वारे शैक्षणिक वर्ष २०२५-२६ करीताच्या विद्यमान/नवीन संस्था/अभ्यासक्रम इत्यादीच्या मान्यता प्रक्रियेसंदर्भातील अटी, शर्ती, मानके व मान्यता प्रक्रियेचे वेळापत्रक प्रसिद्ध करण्यात आले होते. शासनाच्या संदर्भाधीन पत्र क्रमांक २ अन्वये फार्मसी कौन्सिल ऑफ इंडिया,नवी दिल्ली या शिखर परिषदेकडून वेळोवेळी निर्गमित करण्यात आलेल्या मान्यता प्रक्रियेच्या परिपत्रकानुसार, नवीन संस्था सुरू करणे व विद्यमान संस्थांमध्ये नवीन अभ्यासक्रम सुरू करणे इत्यादीबाबत लागू असलेल्या प्रकरणी शैक्षणिक वर्ष २०२५-२६ करिता शासनाचे ना हरकत प्रमाणपत्र निर्गमित करण्यासंदर्भातील प्रस्ताव स्विकारण्यास व त्यावर कार्यवाही करण्यास मान्यता देण्यात आलेली आहे.

त्यास अनुसरुन कळविण्यात येते की, ज्या औषधनिर्माणशास्त्र अभ्यासक्रमांच्या संस्थांनी पीसीआय कडे त्यांनी निर्धारीत केलेल्या विहीत मुदतीत अर्ज सादर केलेले आहेत अशा संस्थांनी पीसीआय कडे सादर केलेल्या अर्जाची प्रत संबंधित विभागीय कार्यालयाकडे सादर करावी. त्यासोबत विद्यमान संस्थांमधील अभ्यासक्रमांच्या वाढीस व प्रस्तावित नवीन संस्थेच्या मान्यता प्रक्रियेबाबत प्राधिकरणाच्या आवश्यकतेनुसार शासनाच्या ना हरकत प्रमाणपत्र /शासन मान्यतेकरिता खालील प्रमाणे प्रस्ताव संबंधित विभागीय कार्यालयांकडे दिनांक २२.४.२०२५ पर्यंत सादर करण्यात यावेत.

| | |
|---|---|
| १ | नविन बी.फार्मसी अभ्यासक्रमाची संस्था सुरु करणे (New B.Pharmacy Institute) |
| २ | नवीन बी.फार्मसी अभ्यासक्रम सुरु करणे (Introduction of B.Pharmacy New Course) |
| ३ | संस्थेच्या नावात बदल करणे [Change in Name of Institution (applicable for B.Pharm) ] |

| | |
|---|---|
| ४ | संस्थेचा पत्ता / ठिकाण बदल करणे [Change of address / Location of Institution (applicable for B.Pharm)] |
| ५ | अभ्यासक्रम बंद करणे [Closure of course (applicable for B.Pharm)] |
| ६ | संस्था बंद करणे [Closure of the Institution (applicable for B.Pharm)] |
| ७ | ट्रस्टच्या नावात बदल करणे [Change in the Name of trust (applicable for B.Pharm)] |
| ८ | नवीन डी फार्मसी अभ्यासक्रम / नवीन संस्था सुरु करणे [New D.Pharmacy Institute / Introduction of D.Pharmacy New Course ] |

राज्यातील विद्यमान PCI शिखर संस्थेच्या अधिपत्याखालील प्रस्तावित नवीन संस्था व विद्यमान संस्थांपैकी ज्या संस्था संदर्भीय अधिसूचना / जाहीर सूचना / परिपत्रकानुसार PCI नवी दिल्ली यांचेकडे अर्ज करणार आहेत, अशा संस्थांनी शासनाची मान्यता/ शासनाचे ना-हरकत प्रमाणपत्रासाठीचा प्रस्ताव दि. २२.०२.२०१८ च्या शासन निर्णयान्वये निर्धारीत केलेले नोंदणी शुल्क भरलेल्या पावतीसह तात्काळ संबंधित सहसंचालक, तंत्र शिक्षण, विभागीय कार्यालये यांचेकडे सादर करावा. तसेच उपरोक्त नमूद ८ बाबींव्यतिरिक्त इतर प्रकरणी (उदा.प्रवेशक्षमता वाढ/घट इ.) दिनांक २२.२.२०१८ रोजीच्या शासन निर्णयान्वये निर्धारीत केलेले नोंदणी शुल्क विभागीय कार्यालयाकडे भरणा करुन प्रस्ताव सादर करावा.

फार्मसी कौन्सिल ऑफ इंडिया, नवी दिल्ली यांनी निर्धारित केलेल्या मानकांप्रमाणे संस्थेकडे पूर्णपणे सदय:स्थितीत वापरायोग्य सोयीसुविधा असतील तसेच समुचित प्राधिकरणाने निर्धारित केलेली व सक्षम प्राधिका-यांनी निर्गमित केलेली प्रमाणपत्रे उपलब्ध असतील तरच संस्थांनी आपले प्रस्ताव विभागीय कार्यालयांकडे सादर करावेत. तसेच शासनाची मान्यता/ शासनाचे ना हरकत प्रमाणपत्रासाठी प्रस्ताव सादर करण्यास विलंब झाल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी संबधित संस्थांची राहील याची नोंद घेण्यात यावी.

(डॉ. विनोद मोहितकर)
संचालक,तंत्र शिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई

प्रत: सहसंचालक, तंत्र शिक्षण, विभागीय कार्यालय, मुंबई, नाशिक, पुणे, छत्रपती संभाजीनगर, अमरावती व नागपूर -त्यांना कळविण्यात येते की, सदर परिपत्रक त्यांचे कार्यक्षेत्रातील विद्यमान PCI या शिखर संस्थेच्या अधिपत्याखालील संस्थाना आपले स्तरावरुन अग्रेषित करावे.